पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478

Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.

NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,

PUNE MAHARASHTRA - 411001

E-Mail ID : crimepress.pune@gov.in

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२७/०९/२०१९

## दि.२६/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे २१२/१९,भादविक ४०६,४२०,५०६ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३५,रा.पेडर रोड,मुंबई |
| **आरोपी** | एक इसम,वय-३९,रा.पौड रोड,कोथरूड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१०/२०१८ रोजी ते आजपावेतो इंनयांग ओरीयंटल किझीन हॉटेल गाळा नं.१, अमिताश्री बिल्डींग,हॅपी कॉलनी,कर्वेरोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे भागीदारीतील पार्टनर यातील नमुद इसम याने हॉटेल व्यवसायातुन येणा-या आवक मधील २५ लाख रूपये रक्कम ही वेळावेळी फिर्यादी यांचे संमतीशिवाय त्यांचे फर्मचे नुकसान व्हावे,तसेच सदर इसमाने त्याचा स्वतःचा फायदा व्हावा या उद्देशाने फिर्यादी यांचा विश्वासघात करून,सदर रकमेचा अपहार करून,फिर्यादी यांची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी. (गुन्हे) राजेश तटकरे ८३२९४७९९२० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ३३०/१९,भादविक ४०६,४२०,५०६,३४,महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिका (बांधण्यास प्रोत्साहन देणे,विक्री,व्यवस्थापण व हस्तांतरण यांचे नियमन करण्या बाबत) अधि. १९६३ चे कलम ३,५ व ८ |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ नागरीक,वय-६७ वर्षे,रा.मगरपट्टा रोड,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | दोन डेव्हलपर्स प्रा.लिमी.कंपनी,बंडगार्डन रोड,पुणे व इतर व इतर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०५/२००९ रोजी ते दि.१६/०५/२०१९ रोजीपर्यंत ४५,निर्वाण हिल्स,स.नं.४४,सीटीएस नं. ५२,दशभुजा गणपती,पौंड फाटा,पौड रोड,कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी ४५ निर्वाण हिल्स या प्रोजेक्ट मधील १४ व्या मजल्यावरील फ्लॅट नं.६०१, एरीया १३४६ चौरस फुट व तळमजल्यावरील पार्कीग नं.१४ व १५ हा रजिस्टर दस्त दि.०८/०३/२०१० प्रमाणे रक्कम ०१,०९,९२,९७५/- (एक कोटी नऊ लाख ब्यान्नवहजार नऊशे पंच्याहत्तर) एवढया रक्कमेस खरेदी केला. करार नाम्यानंतर फिर्यादी यांची सुन यांचे बँक खात्यावरुन २२,००,०००/- रुपये रक्कम व फिर्यादी यांनी कर्ज घेतलेल्या रक्कमेतील रुपये ५७,१७,४११/- अशी दोन्ही मिळुन रक्कम ७९,१७,४११/- एवढी रक्कम सदर इसमांचे कंपनीचे बँकेतील खाते क्रमांकांवर जमा केली. सदरची रक्कम त्यांनी नमुद कारणासाठी न वापरता,ती इतरत्र वापरुन,फिर्यादी यांचे फ्लॅटचा ताबा करारनाम्याप्रमाणे सन २०१३ मध्ये देय असताना,तो अदयापर्यंत दिलेला नाही. तसेच फिर्यादी यांचेप्रमाणेच इतर २३ लोकांकडुन खरेदी केलेल्या फ्लॅटपोटी रक्कम १३,४०,८९,५२४/- (तेरा कोटी चाळीस लाख एकोनव्वद हजार पाचशे चोवीस) एवढी रक्कम प्राप्त करुन त्यारक्कमा देखील नमुद कामाकरीता न वापरता इतरत्र वापरुन,त्यांना देखील करारनाम्या प्रमाणे ठरलेल्या वेळेत फ्लॅटचे काम पुर्ण करुन ताबा दिला नाही. त्यामुळे फिर्यादी व इतर साक्षीदार यांचे सदर बिल्डर व इतरांनी मोठया प्रमाणावर नुकसान केले आहे. फिर्यादी व इतर साक्षीदार यांना ताबा वेळेत न दिल्या मुळे बिल्डरने त्यांच्याकडुन प्राप्त रक्कमेवर व्याज देणे बंधनकारक असताना ते फिर्यादी व इतर साक्षीदार यांना अदयापर्यंत दिले नाही. |

तसेच फिर्यादी व इतर साक्षीदार यांना फ्लॅट बुक करताना दाखविलेल्या नकाशात त्यांच्या संमतीशिवाय परस्पर फेरबदल केले आहेत. अशा प्रकारे फिर्यादी व इतर साक्षीदार यांची एकुण १४,२०,०६,९३५/- (चौदा कोटी वीस लाख सहा हजार नऊशे पस्तीस) एवढी रक्कम दोन्ही डेव्हलपर्स लिमी. कंपनी व तीचे संचालक व इतरांनी प्राप्त करुन,सदर रक्कम ज्या कामाकरीता प्राप्त केली होती, ती त्या कामासाठी न वापरता,तीचा अन्य ठिकाणी वापर करुन,फिर्यादी व इतर साक्षीदार यांची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** वरिष्ठ पो.निरी. प्रतिभा जोशी ९८५०१४०७६०

**३**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोथरूड पो स्टे ३२९/१९,भादविक ३८०

**फिर्यादी** किरण पाटील,वय-४९ वर्षे,धंदा-व्यापार,रा.पौंड रोड,कोथरुड,पुणे

**आरोपी** अज्ञात (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२५/०९/२०१९ रोजी ०९/३० वा.ते १०/३० वा.चे दरम्यान अरिहंत इलेक्ट्रीकल वर्क्स,पुष्कर बिल्डींग,गाळा नं.५ व ६ होंडा शो-रुम जवळ,पौंड रोड,कोथरुड,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे अरिहंत इलेक्ट्रीकल वर्क्स नावाचे दुकान असुन,त्यांनी दि.२५/०९/२०१९ रोजी सकाळी ०९/३० वा.त्यांचे दुकान उघडले असताना,त्यांचे दुकानात पावसाचे पाणी आले होते. फिर्यादी हे दुकानातील पाणी काढत असताना,दुकानात कोणीही नव्हते. ते दुकानातील पाणी काढत असताना,त्यांना दुकान सोडुन बाजुला जावे लागत होते. साधारणतः सकाळी १०/३० वा.चे सुमारास दुकानातील पाणी काढुन दुकानात बसले असता,त्यांना दुकानातील एम.एम.इलेक्ट्रीक वायर / केबलची एकुण ८८ बंडले व एक मोबाईल दिसुन आले नाही. तरी फिर्यादी हे त्यांचे दुकानाचे शटर उघडुन पावसाचे पाणी काढत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,दुकानाचे उघडे असलेल्या शटरवाटे आत प्रवेश करुन,दुकानातील इलेक्ट्रीक वस्तु व मोबाईल असा एकुण २,९५,९६०/- रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला आहे.

**त.अंमलदार** म.सहा.पो.निरी. व्ही.व्ही.पाटील ७०३८८४२१६५

## <u>दि.२७/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**१**

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे ६८०/१९,भादविक ३०२

**फिर्यादी** मनीष पिंपुटकर,वय- ४३ वर्षे,रा.गोखले रोड,शिवाजीनगर,पुणे

**आरोपी** अज्ञात व्यक्ती (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२६/०९/२०१९ रोजी २२/०० वा.पुर्वी फ्लॅट नं.१६,बि.नं.५-बी,सनशाईन कोर्ट सोसायटी, कल्याणीनगर,येरवडा,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचा मित्र आसीन शहा,रा.गोरेगाव,मुंबई यांचे पत्नीची आत्या श्रीमती.चांदणी चौहान वय- ६७ वर्षे रा.फ्लॅट नं.१६,बि.नं.५-बी,सन शाईन कोर्ट सोसायटी,कल्याणीनगर, येरवडा,पुणे हि तीचे राहते घरी असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन तीचे राहते घरामध्ये श्रीमती.चांदणी चौहान हिचा खुन केला आहे.

**त.अंमलदार** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, युनुस शेख ८६९३००९१११

**" गुन्हयांमध्ये हस्तगत केलेला किमती व मौल्यवान मुद्देमाल फिर्यादीस पुनःप्रदानचे कार्यक्रमा बाबत"**

**सर्व प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यांना कळविण्यात येते की, मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.के.व्यंकटेशम् यांचे हस्ते आज <u>दि.२७/०९/२०१९ रोजी १६/०० वा.</u> "गुन्हयांमध्ये हस्तगत केलेला किमती व मौल्यवान मुद्देमाल, त्यामध्ये सोन-चांदीचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल तसेच मोटार सायकली असा ऐवज फिर्यादीस पुनःप्रदान करण्याचा कार्यक्रम" <u>कॉप्स एक्सलन्स हॉल,पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u> येथे आयोजीत केला आहे."**

**तरी सदर कार्यक्रमाचे वृतांकन करण्यासाठी आपले फोटोग्राफरसह आपण उपस्थित राहावे हि विनंती.**

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**